# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 924 /शि.वि./2017
दि. 29 /07/2017

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :– नागपूर महानगरपालिका 'आदर्श शिक्षक' पुरस्कार 2017 करीता अर्ज सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :–मा.सभापती, शिक्षण समिती,म.न.पा., नागपूर यांचे दि. 18.07.2017 चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेतील, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळेत कार्यरत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिकांच्या दर्जेदार व उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची, सामाजिक व सांस्कृतिक कार्याची नोंद घेऊन दरवर्षी म.न.पा. द्वारा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहिर करण्यात येते.

सन् 2017–18 या शैक्षणिक सत्रात खालील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिकांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :–**

1)दि. 30 एप्रिल 2017 रोजी ज्या सहाय्यक शिक्षकांची सेवा 15 वर्षाचे वर सेवा झाली असेल अशाच शिक्षक व शिक्षिकांनी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करावेत.
2)दि. 30 एप्रिल 2017 रोजी ज्या मुख्याध्यापकांची एकूण सेवा 20 वर्षाचे वर झाली असेल अशाच मुख्याध्यापकांनी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करावेत.
3)अर्ज विहित नमून्यातच सादर करावा.
4)एका व्यक्तीला फक्त एकदाच पुरस्कार मिळू शकेल.
5)यापूर्वी ज्यांना उपरोक्त पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे. त्यांनी पुन्हा अर्ज करू नये.
6)आदर्श शिक्षक पुरस्काराकरीता विहित नमून्यातील अर्ज शिक्षण विभाग कार्यालयातून दि.01/08/2017 पासून दि. 07/08/2017 पर्यंत सकाळी 11 ते 5 या वेळात श्रीमती मीना गुप्ता, सहा. शिक्षणाधिकारी यांच्याकडे मिळतील.
7)विहित नमून्यातील प्रस्ताव पुस्तिका द्विप्रतीत सादर करावे. प्रस्ताव दिनांक 14 ऑगस्ट 2017 पर्यंत शिक्षण विभाग कार्यालयात सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. उशीरा प्राप्त होणारे, डाकद्वारे प्राप्त होणारे व अपूर्ण माहितीसह सादर केलेले अर्ज फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**प्रस्ताव पुस्तिकेबाबत सूचना :–**

1)प्रस्ताव पुस्तिकेचा आकार 35 x 22 से.मी. असावा.
2)प्रस्ताव पुस्तिकेचा कव्हर जाड खडर्याचे नसावे.
3)प्रस्ताव पुस्तिकेच्या दर्शनी भागावर शिक्षकाचे संपूर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, मराठी किंवा इंग्रजीत लिहावे.
4)प्रस्ताव पुस्तिकेच्या मुख्य पृष्ठावर ठळक अक्षरात म.न.पा. आदर्श शिक्षक पुरस्कार 2017 करीता असे लिहावे.

(संध्या मेडपल्लीवार)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.महापौर, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा.सभापती, शिक्षण समिती, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2) मा.उपायुक्त–1, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.

D:Reshma/tembhurne/letter 2017